## पवित्र पोर्टलमध्ये शिक्षण सेवक पदाकरिता अर्ज करणा–या उमेदवारांसाठी सूचना :

अर्जात हेतुपुरस्सर खोटी, चुकीची व अपूर्ण माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्याच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले अथवा बनावट दाखले सादर करणे. विहित केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल आणि किंवा इतर योग्य अशा शिक्षेस पात्र राहील.

(अ) सर्वसाधारण सूचना :

1. नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वतःच करणे आवश्यक आहे.

2. अर्ज मराठी व इंग्रजी मध्ये उपलब्ध करून देण्यात आला असला तरी संगणक प्रक्रियेकरिता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. अर्जातील संपूर्ण माहिती Capital Letters मध्ये भरावी. संक्षिप्त (Abbrivations) अथवा आद्याक्षरे (Initials) न देता संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या/पत्याच्या दोन भागांमध्ये एका स्पेसने जागा सोडावी.

3. शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक मानण्यात येईल

4. संबंधित शैक्षणिक अर्हतेच्या अभ्यासक्रमातील सर्व सत्रांच्या परीक्षा अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अगोदरच्या सत्रातील/वर्षातील परीक्षेत अनुत्तीर्ण असल्यामुळे, कोणत्याही टप्प्यावरील निकाल राखून ठेवण्यात आला असल्यास संबंधित शैक्षणिक अर्हता धारण केली असे मानण्यात येणार नाही.

5. पत्रव्यवहाराचा पत्ता इंग्रजीमध्ये लिहावा.

6. वय, शैक्षणिक अर्हता, जात प्रवर्ग, उन्नत गटात मोडत नसल्याबाबत, दिव्यांग व्यक्ती, महिला, माजी सैनिक, अंशकालीन, अनाथ, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त इत्यादी संदर्भात न चुकता निसंदिग्ध/निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास संबंधित दाव्याचा विचार केला जाणार नाही व या संदर्भात कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

7. अर्ज सादर करताना अर्जाव्दारे केलेला वय, जात प्रवर्ग, शैक्षणिक अर्हता, महिला, माजी सैनिक, अंशकालीन, अनाथ, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, दिव्यांगत्वाचा दावा इत्यादी बाबीमध्ये तदनंतर कोणत्याही कारणास्तव बदल करता येणार नाही.

8. अर्ज सादर करताना वय, शैक्षणिक अर्हता, जात प्रवर्ग, उन्नत गटात मोडत नसल्याबाबत, माजी सैनिक, अंशकालीन, अनाथ, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याची सबब

www.fjs.co.in

सांगून त्यानंतर अर्जातील माहितीमध्ये बदल करण्याची विनंती केल्यास ती कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतली जाणार नाही.

9. अर्जाव्दारे संबंधित संस्थेकडे विविध प्रकारचा दावा करताना शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले सुधारित शासन निर्णय, शासन परिपत्रक व आदेश लक्षात घेणे आवश्यक राहील. त्यासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

10. अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे उमेदवारास प्रमाणपत्र पडताळणीसाठी तात्पुरते पात्र समजण्यात येईल. अर्जामध्ये दिलेली पात्रतेविषयक माहिती मूळ कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या आधारे तपासण्यात येईल व त्याच्या आधारे पात्र आढळून आल्यानंतरच उमेदवाराची निवड करण्यात येईल. अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल व आवश्यकता भासल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(ब) **शैक्षणिक/व्यावसायिक अर्हता** –

1. संबंधित पदाच्या वर्तमानपत्र/संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमध्ये नमूद केल्यानुसार विहित शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करणे आवश्यक राहील. सदरची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता मान्यताप्राप्त बोर्ड, विद्यापीठ यांचेकडून प्राप्त केलेली असणे आवश्यक राहील.

2. संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये तरतूद असल्यासच महाराष्ट्र शासनाने समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून मान्य केलेल्या पदवी/पदविका स्वीकारार्ह असतील.

(क) **वयोमर्यादा** –

1. शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय दि. २३/६/२०१७ नुसार शिक्षण सेवक पदासाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे व कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता ३८ वर्षे राहील. मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांकरिता ४३ वर्षे राहील. वयोमर्यादेची गणना महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशांमधील तरतुदीनुसार करण्यात येईल.

2. खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल करण्यात येईल.

3. पात्र दिव्यांग उमेदवारांना उच्च वयोमर्यादा वयाच्या ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

4. प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा ४५वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

5. अंशकालीन उमेदवारांसाठी वयोमर्यादा ४६ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

6. माजी सैनिकांसाठी किमान पाच वर्षे सैन्यात सलग सेवा झालेली आहे व ज्यांना नेमून दिलेले काम पूर्ण झाल्यास कार्यमुक्त केले आहे (यामध्ये ज्यांचे नेमून दिलेले काम पुढील सहा महिन्यात पूर्ण होणार आहे व त्यानंतर त्यांना कार्यमुक्त करण्यात येणार आहे, त्यांचाही समावेश आहे) किंवा ज्यांच्या बाबतीत पाच वर्षांचा सैनिकी सेवेचा नेमून दिलेला कालावधी पूर्ण झाला आहे व ज्यांची नेमणूक पाच वर्षांपुढे वाढवून देण्यात आलेली असून त्यांना शासकीय सेवेत नेमणूक मिळाल्यास तीन महिन्यात कार्यमुक्त करण्यात येईल,

www.fjs.co.in

असे प्रमाणित करण्यात येणार असेल, अशा माजी सैनिक/आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकाऱ्यासाठी कमाल वयोमर्यादेत पाच वर्षे सवलत देण्यात येईल.

7. शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक १०१०/प्र.क्र.२७९/१०/१६ – अ, दिनांक २० ऑगस्ट, २०१० नुसार माजी सैनिकासाठी शासन सेवेतील गट क व गट ड मधील पदासाठी नेमणुकीकरीता विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक तीन वर्षे इतकी राहील.

8. माजी सैनिकांना असलेल्या वयोमर्यादेतील सवलतीच्या प्रयोजनार्थ उमेदवारांनी सोबतच्या परिशिष्टामध्ये दिलेल्या नमुन्यात सक्षम प्राधिकाऱ्यांनी (लागू असेल त्याप्रमाणे) प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदावर शिफारशीसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यांच्यासाठी आरक्षित असलेली पदे त्या त्या प्रवर्गातील गुणवत्ताक्रमानुसार अर्हताप्राप्त उमेदवारांमधून भरण्यात येतील.

(ड) **प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावयाची कागदपत्रे** –

1. अर्जासोबत कोणतीही कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही. अर्जात केलेल्या दाव्यानुसार विहित टप्प्यावर संबंधित कागदपत्रांच्या आधारे पात्रता तपासण्याच्या अधीन राहून उमेदवाराची गुणवत्ता व प्रवर्गनिहाय निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात निवड करण्यात येईल अथवा पुढील टप्प्यावरील कार्यवाहीसाठी पात्र समजण्यात येईल.

2. विहित टप्प्यावर प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवारांनी पात्रतेसंदर्भात खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

**वयाचा पुरावा** –

(i) माध्यमिक शालांत परीक्षेचे प्रमाणपत्र.

(नसल्यास)

(ii) जन्मदिनांक नमूद असलेला शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला.

(नसल्यास)

(iii) ग्राम पंचायत/नगर पंचायत/नगर पालिका/नगर परिषद/कटक मंडळे/महानगरपालिकेकडील जन्म दाखला.

टीप : सर्व कारणांसाठी माध्यमिक शालांत प्रमाणपत्रच ग्राहय धरले जाईल.

www.fjs.co.in

(इ) शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा –

1. माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (एस. एस. सी.) परीक्षेचे किंवा तत्सम समकक्ष परीक्षेच्या बाबतीत संबंधित मंडळाचे गुणपत्रक व प्रमाणपत्र.

2. उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (एच.एस.सी.) किंवा तत्सम समकक्ष परीक्षेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र.

3. पदवी किंवा पदविका परीक्षांच्या बाबतीत प्रत्येक परीक्षेचे मंडळ/विद्यापीठ/सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व गुणपत्रक.

4. पदव्युत्तर पदवी परीक्षेचे विद्यापीठ/सक्षम प्राधिकरणाचे गुणपत्रक व प्रमाणपत्र. (लागूअसलेले)

5. राज्य व केंद्र शासनाने घेतलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेचे पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र.(लागू असेल तेथे)

6. अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षेचे गुणपत्रक.

(ई) मागासवर्गीय उमेदवार असल्याबद्दलचा पुरावा (फक्त मागासवर्गीय उमेदवारांसाठी)

1. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग म्हणून संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या जातीविषयक प्रमाणपत्राची प्रत.

2. जात पडताळणी समितीने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र.

3. वि. जा. (अ), भ. ज. (ब), भ. ज. (क), भ. ज. (ड), वि.मा.प्र. व इ.मा. प्रवर्गातील उमेदवाराने जाहिरात ज्या वित्तीय वर्षात (एप्रिल ते मार्च ) दिलेली असेल त्या वर्षाचे लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षातील उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे (non creamy layer certificate) सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. त्यापूर्वीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही.

(फ) दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा –

1. अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) नियम, १९९५ व तदनंतर यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विहित करण्यात आलेल्या पध्दतीनुसार दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

2. शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि २०१२/प्र.क्र. २९७/आरोग्य ६, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१२ अन्वये शासनाने जारी केलेल्या आदेशानुसार Software for Assessment of Disability, Maharashtra (SADM) या नवीन संगणक प्रणालीव्दारे वितरीत करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

www.fjs.co.in

3. दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षणाचा अथवा दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेतील सवलतीचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यात सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करावे.

4. दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा व वयोमर्यादेतील सवलतीचा लाभ मिळविण्यासाठी दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे.

**(ग) माजी सैनिक असल्याचा पुरावा –**

1. माजी सैनिकासाठी असलेल्या वयोमर्यादेचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यात (लागू असेल त्याप्रमाणे) सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

2. माजी सैनिक उमेदवाराने विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि पद भरतीसाठी आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अर्ज केला असेल तर संबंधित प्रवर्गातील उमेदवारांप्रमाणे माजी सैनिकांना देखील उन्नत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र (non creamy layer certificate) सादर करणे आवश्यक राहील.

**(च) अमागास महिला आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा –**

1. महिलांसाठी आरक्षित पदाकरीता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domicile) असल्याबाबत तसेच उन्नत गटात मोडत नसल्याबाबत (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून ) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

2. अमागास महिलांसाठी आरक्षित असलेल्या पदासाठी दावा करणा–या अमागास महिला उमेदवारांनी जाहीरात ज्या वित्तीय वर्षामध्ये (एप्रिल ते मार्च) दिलेली असेल त्या वित्तीय वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षातील सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (non creamy layer certificate) पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

3. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही १०१२/प्र.क्र. १६/१२/१६ अ, दिनांक १३ ऑगस्ट २०१४ अथवा तदनंतर शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार मागास वर्गवारीकरीता प्रदान करण्यात आलेले नॉन–क्रिमीलेअर प्रमाणपत्र अमागास महिलांसाठी आरक्षित पदाकरीता ग्राह्य धरले जाणार नाही.

4. मागासवर्गीय महिला उमेदवारांच्या बाबतीत शासन पत्र, सामाजिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी १०/२००४/प्र.क्र. ६८७/मावक –५, दिनांक २९ ऑक्टोबर २००४ मधील आदेशानुसार निर्गमित करण्यात आलेले विवाहापूर्वीचे नाव अंतर्भूत असलेले, उन्नत गटामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

www.fjs.co.in

**(छ) खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरिता पात्र असल्याचा दावा –**

1. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी आरक्षित पदावर दावा करणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यात (लागू असेल त्याप्रमाणे) सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

2. खेळाडूसाठी आरक्षित पदाकरीता दावा करणाऱ्या उमेदवारांनी त्यांची पात्र खेळाडू असल्याबाबतची प्रमाणपत्रे पडताळणीपूर्वी संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अथवा सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे.

3. खेळाडूंसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांना शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग व क्रीडा विभाग दि. १ जुलै २०१६ व दि. १८ ऑगस्ट २०१६ मधील क्रीडाविषयक अर्हतेच्या तरतुदी लागू राहतील.

**(ज) विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा –**

1. विवाहित स्त्रियांना विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला किंवा नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांचेकडून नावात बदल झाल्यासंबंधीचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

**(ल) मागासवर्गीय आरक्षण –**

1. मागासवर्गाचे आरक्षण महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, निरचिसूचित जमाती (विमुक्त जाती) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निमंत्रित केलेल्या आदेशानुसार राहील.

2. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग परिपत्रक क्र. एसएसएन–१००५/(९४/०५)/माशि–०२ दि. १ ऑक्टोबर २००८ नुसार मागासवर्गीयांसाठी आरक्षण लागू राहील.

3. वि. जा. (अ), भ. ज. (ब), भ. ज. (क), भ. ज. (ड), वि. मा. प्र. व इ.मा.व. या मागासवर्गासाठीच्या आरक्षणाबाबतच्या तरतुदी/शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. व्हीजेएनटी २०१४/प्र.क्र. ११८/ व्हीजेएनटी १ दिनांक ३१ जुलै २०१४ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहतील.

4. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र. एसटीसी – १६९६/प्र. क्र. ३४/का –१०, दिनांक ७ मार्च १९९६ नुसार अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना तसेच, शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्र. बीसीसी १०/२००१/प्र.क्र १२०/मावक ५ दिनांक १ नोव्हेंबर २००१ नुसार अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी तसेच ज्या जातींसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागते, असे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्यांना सक्षम प्रधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

www.fjs.co.in

(i) संबंधित उपविभागीय अधिकारी (महसूल) (दोन) उपजिल्हाधिकारी किंवा (तीन) जिल्हाधिकारी उपरोक्त सक्षम प्राधिकाऱ्यांनी जातीच्या प्रमाणपत्रावर अन्य कोणताही शिक्का न मारता उपविभागीय अधिकारी (महसूल), उपजिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी असा शिक्का मारून जातीचे प्रमाणपत्र निर्गमित केले असणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही प्रकारे निर्गमित केलेले प्रमाणपत्र वैध समजले जाणार नाही.

(ii) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सीबीसी १०९६/प्र.क्र. ४८/मावक -५, दिनांक १३ सप्टेंबर १९९६ नुसार तालुका दंडाधिकारी यांनी दिनांक ३ जून १९९६ पूर्वी प्रदान केलेले जातीविषयक प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

(iii) शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सीबीसी १०९४/प्र.क्र.८६/मावक - ५ दिनांक २२ नोव्हेंबर १९९५ तसेच शासनपत्र सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी - १०/२००६/प्र.क्र. १६२/मावक ५ दिनांक १८ एप्रिल २००६ मधील आदेशानुसार ज्या व्यक्तीच्या नावे जातीचे प्रमाणपत्र असेल ती व्यक्ती व त्या व्यक्तीचे कुटुंब क्रिमी लेअर मध्ये मोडत नसल्याचे व धारकाच्या नावाने सर्वसाधारण रहिवास प्रमाणपत्रात प्रमाणित करणे आवश्यक आहे.

(iv) महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवाशी असलेल्या स्थलांतरित मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी - १०८५/२६३०४/(बीसीडब्ल्यू -५ दिनांक ६ ऑक्टोबर, १९८६ मधील आदेशानुसार निर्गमित करण्यात आलेली प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येतील.

(v) उमेदवारांनी महाराष्ट्र राज्याचे अधिवास असल्याचे प्रमाणपत्र स्वतःच्या नावाने सादर करणे आवश्यक आहे.

(vi) जातीच्या प्रमाणपत्रात उमेदवार आणि त्यांचे कुटुंबीय महाराष्ट्र राज्यात सर्वसाधारण वास्तव्य असल्याची तरतूद करण्यात आली असेल तर अशा प्रकरणी महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असल्याबाबतचा दाखला सादर करणे उमेदवारास सर्वसाधारणपणे बंधनकारक राहणार नाही. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५७ च्या कलम २० नुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

(vii) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग प्रवर्गाचा दावा सांगणाऱ्या उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नाहीत असे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे व त्याबाबतच्या प्रमाणपत्राच्या प्रती पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. विहित प्रमाणपत्राच्या प्रती सादर न केल्यास अशा उमेदवाराचा संबंधित मागास प्रवर्गाचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही.

www.fjs.co.in

(म) महिलांसाठीचे आरक्षण –

1. महिलासाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक ८२/२००९/मसआ २०००/प्र.क्र. ४१५ का –दिनांक २५ मे २००१ आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

2.महिलांच्या आरक्षित पदांच्या लाभाकरिता महिला उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवासी असावा.

3. महिलांचे आरक्षण हे त्या त्या प्रवर्गासाठी समांतर आरक्षण राहील. तथापि भरतीच्या वर्षात मागासवर्गीय महिलांकरीता आरक्षित पदासाठी त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारामार्फत भरण्यात येईल.

4. अमागास महिला उमेवारांपैकी उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रीमी लेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील महिला सदस्यांनाही त्या प्रवर्गातील महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

5. अमागास महिलांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या अमागास महिला उमेदवारांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवास (Domicile) असल्याबाबत तसेच व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

6. अमागास/खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदांसाठी दावा करणाऱ्या अराखीव/खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी आयोगातर्फे जाहिरात ज्या वित्तीय वर्षात (एप्रिल ते मार्च ) दिलेली असेल त्या वर्षापूर्वीच्या वित्तीय वर्षातील उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले खुल्या प्रवर्गातील महिलांकरिताचे उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे (non creamy layer certificate) प्रमाणपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. त्यापूर्वीचे प्रमाणपत्र आयोगाकडून ग्राह्य धरण्यात येणार नाही.

7. अन्य मागासवर्गातील उमेदवारासाठी विहित करण्यात आलेले नॉन–क्रिमीलेअर प्रमाणपत्र अमागास/खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित असलेल्या पदाकरीता ग्राह्य धरले जाणार नाही.

8. शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सीबीसी १०९८/प्र. क्र. १५१/मावक ५, दिनांक ७ मे १९९९ अन्वये शासनाने आंतरजातीय विवाह केलेल्यांना मिळणाऱ्या मागासवर्गाच्या सवलती/फायदे रद्द केले आहेत. त्यानुसार आंतरजातीय विवाह केलेल्या उमेदवारांनी अर्ज सादर करताना आवश्यक ती दक्षता घ्यावी.

(भ) पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी आरक्षण –

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. पअंक–१००९/प्र.क्र. २००/२००९/१६–अ, दि. २७ ऑक्टोबर २००९ अन्वये 'सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य' या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये

www.fjs.co.in

तीन वर्षांपर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय/निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी १० टक्के समांतर आरक्षण लागू राहील. तसेच सध्याच्या ४५ वर्षे वयोमर्यादेत आणखी 1 वर्षाने वाढ करुन ही सवलत ४६ वर्षापर्यंत देण्यात आली आहे. वयोमर्यादा/आरक्षण सवलतीच्या प्रयोजनार्थ उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्यांनी (लागू असेल त्याप्रमाणे) प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**(न) प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्तांसाठी आरक्षण –**

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ/ दि. २७ ऑगस्ट २००९ अन्वये प्रकल्पग्रस्तांना असलेले ५% समांतर आरक्षण त्यांचेसाठीच राखून ठेवून या आरक्षणांतर्गत भूकंपग्रस्तांसाठी ठेवलेले आरक्षण काढून भूकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे २% समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे. आरक्षण सवलतीच्या प्रयोजनार्थ उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्यांनी (लागू असेल त्याप्रमाणे) प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**(य) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञाप्रत्र –**

1. विहित नमुन्यानुसार साध्या कागदावर टंकलिखित करून प्रतिज्ञापत्र सादर करावे.

2. प्रतिज्ञापत्रात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

**(र) ओळखपत्राबाबत –**

कागदपत्र पडताळणीच्या वेळी स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्राइव्हिंग लायसन्स यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**(ह) संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान –**

महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम १९९९ मधील तरतुदीनुसार शासनाने वेळोवेळी आवश्यक ठरविलेली संगणक अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

**(क्ष) महत्त्वाचे :**

1. अर्ज सादर केल्यापासून निवड प्रक्रिया संपेपर्यंतच्या काळात घडणारे बदल, उदा. निलंबन, दंड, फौजदारी खटला, शिस्तभंगविषयक अथवा तत्सम कारवाई इ. संस्थेस वेळोवेळी कळविणे आवश्यक आहे. संस्थेकडे अर्ज सादर केल्यानंतर घडून आलेले बदल संस्थेस न कळविल्यास अशा उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

www.fjs.co.in

2. नियमानुसार नियुक्तीसाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांना निवडीसाठी पात्र असलेल्या संबंधित आस्थापनांनी निश्चित केलेल्या वैद्यकीय मंडळाकडून शासनाच्या निर्देशानुसार वैद्यकीय तपासणी करून घ्यावी लागेल. वैद्यकीय मंडळाकडून शारीरिक व मानसिकदृष्ट्या पात्र असल्याचे प्रमाणित करणे आवश्यक राहील.

**3. सदरहू भरती प्रक्रियेसाठी राज्यातील कोणत्याही कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच अशासकीय व्यक्ती यापैकी कोणाचीही अभिकर्ता/माध्यम म्हणून नियुक्ती केलेली नाही. नोकरीस लावून देतो असे सांगून फसवणूक करणाऱ्यांपासून तसेच तोतयागिरीपासून अर्जदाराने सावध रहावे. असा प्रकार निदर्शनास आल्यास तात्काळ शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक) यांचे कार्यालयास कळवावे. सदर भरती प्रक्रियेसंबंधी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.**

www.fjs.co.in